**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 6, JUNE - 2022 Publication Date: 30/06/2022

DOIs:10.2018/SS/202206014 --:-- Research Article

# शिक्षणाच्या उद्गमतेची संकल्पनां

## (concept of genesis of education)

**Manish Tukarampant Ambekar**
T.G.T. SOCIAL STUDIES, JAWAHAR NAVODAYA VIDYALAYA KHAVALI
TQ.SATARA DIST. SATARA PIN 415003
Email - ambekar023@gmail.com

***Abstract:*** Education is the only key for any nation for development as a Nation and also for a person. Many educationists define education from time to time. education is transformed from gurukul to modern school with same dedication and intention. though education was controlled by some section of the society despite of that every person got education from different field. Education starts from stone age with art and with drawing pictures. Art education might be the first branch of education and music after that. botany, and other branches of education were taught latter

***Key Words:*** *education , development, art, painting, music, literature.*

## 1. INTRODUCTION:

कोणत्याही देशामध्ये जर त्या देशाचा विकास साधावयाचा असेल तर त्या देशामध्ये असणार्यां शिक्षण पद्धती कडे पहावे लागेल. त्या देशा मध्ये दिले जाणारे शिक्षण त्या मध्ये अंतर्भूत असणारे घटक त्या देशा मध्ये दिले जाणारे शिक्षणाचा उद्देश त्याच बरोबर त्या उद्देशाची प्राप्ती करणारे अभ्यास घटक ह्यांचा समावेश होतो .त्या समाजामध्ये असणारी सामाज मुल्ये त्या देशातील व समाजातील शिक्षण पद्धती मध्ये असणे आवश्यक आहे.

## 2. LITERATURE REVIEW:

शिक्षण म्हणजे काय ह्याची व्याख्या बर्याच भारतीय तथा पाश्चात्य शिक्षण तज्ञांनी करून ठेवली आहे .महात्मा गांधीजी सांगतात त्या प्रमाणे शिक्षण म्हणजे आत्म्याचा विकास आहे तर टागोर सांगतात त्या प्रमाणे शिक्षण म्हणजे सुप्त गुणांचा विकास डॉ आंबेडकर सांगतात त्या प्रमाणे शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ज्या मुळे आत्म विश्वास निर्माण होतो तर पंडित मदन मोहन मालवीय म्हणतात त्या प्रमाणे शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास तर शिक्षण म्हणजे स्वामी विवेकानंद आत्मिक उन्नती सांगतात ,सर्वपल्ली राधाकृष्णन ,योगी अरविंद ह्यांच्या देखील शिक्षणाच्या अश्याच संकल्पना आहेत . प्राचीन काळा पासून ते आजतागायत शिक्षणनाची पद्धत बदलली सोबतच तिचा वैचारिक गुणधर्म बदलला असेल व्याप्ती बदलली असेल तरी एक मुख्य हेतू आज देखील कायम आहे तो म्हणजे शिक्षणाचे महत्व टिकून आहे काळाप्रमाणे ह्यां मध्ये बरेच बदल निच्छित झाले आहेत पण मुळ गाभां हा तोच आहे .प्राचीन काळी गुरुकुल पाध्धतीद्वारे शिक्षण दिले घेतले जाई आज त्याची जागा मोठ्या मोठ्या इमारतींनी घेतली असेल तरी मूळ मर्म तेच आहे विद्यार्थ्याचा विकास ह्या मध्ये मूळतत्व म्हणून आपण समजू शकतो

शिक्षणाशिवाय शिक्षणाची अन्य शाखांची द्वारे सर्वांसाठी उघडी होती त्यामुळे त्या त्यां काळात विज्ञानाच प्रसार झालेला दिसून येतो, जर वेगवेगळ्या शास्त्रांचा अभ्यास केला तर आपणास हे दिसून येईल कि त्या शास्त्रामध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार असल्या शिवाय हे ज्ञान देता वा घेता येणे शक्य नव्हते ह्यां मध्ये मुर्तीशास्त्र, धातू शास्त्र , आयुर्वेद, धनुर्वेद बांधकाम शास्त्र ,अवकाश शास्त्र ,जोतिष पंचांग भूगोल ,मंदिर शास्त्र ,कायदा, अर्थशास्त्र ,राज्यशास्त्र ह्या बरोबरीने नितीशास्त्र ,युद्ध शास्त्र , खगोल शास्त्र ,ह्या प्रमाणे अनेक शास्त्र शाखांचा समावेश होतो .भगवान गणेश १६ विद्या ६४ कलांची देवता म्हणून प्रसिद्ध आहेत ह्याचा अर्थ किमान इतक्या ज्ञान शाखा होत्या .ह्या सर्व ज्ञानाच्या शाखांचा अभ्यास तत्कालीन समाजामध्ये सर्व मान्य असला पाहिजे .१२ वर्षे गुरु गृही राहून गुरुच्या आदेशां प्रमाणे घेतलेले शिक्षण व्यवहारात आणण्या साठी हे विद्यार्थी समाजा मध्ये जात असत पण त्याच बरोबर नीती शास्त्र हा अध्ययनाचा प्रमुख भाग असल्या मुळे कदाचीत कोणताही विद्यार्थी गरजे पेक्षा अधिक धनाची अपेक्षा करीत नसावेत . समाजातील गरजाच कमी असल्या मुळे संपत्तीची हाव ह्या विद्यर्थ्यांचा ठिकाणी नसावी आथवा नगण्य स्वरूपात असावी , प्रत्यक समाज व प्रत्यक गाव स्वयंपूर्ण होते गावातील गरजा कमी असावयाच्या त्यांच्या गरजा स्थानिक पातळीवरच जास्त करून सोडवल्या जावयाच्या त्या साठी आवश्यक शिक्षण त्यांना त्यांच्या घरूनच दिले जात होते त्या मुळे शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या. शिक्षण आजच्या संकल्पने पेक्षा वेगळे होते गाव व शहर ह्यामध्ये बराच फरक होता गावातील जीवन हे मोठ्या प्रमाणात स्थिर असावे तर शहरातील जीवन हे काला प्रमाणे बदलणारे असावे.

पाषाण काळात आम्हाला जि चित्रे गुहेमध्ये दिसून येतात ती ह्याच कारणांमुळे. भीमबेटका ह्याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल शिक्षणाची सुरुवात इथून झाली असे म्हणता येईल . मनुष्याला दिसणार्या सर्वच प्राण्यान बद्धल आकर्षण होते सभोवताली असणार्या सर्व वस्तूंना प्राण्यांना ह्यातून जवळून अभ्यासण्याची प्रवृत्ती निर्माण होते त्यातूनच नवे नवे धोध करावेसे वाटतात त्यातून नवी नवी चित्रे साकारल्या जात असत .रेषाचे प्रयोग व चित्रकलेच्या माध्यामातून सुरु झालेला हा प्रवास नंतर विविध विषयांना साद घालत पुढे जातो व्यक्तिमत्वाच्या जडण घडणीमध्ये शिक्षणाचे महत्व अनन्य साधारण महत्व आहे .शिक्षणाची सुरुवात प्रयत्येक व्यक्तीची चित्रकले पासून होत असते प्रत्येक जन बालपणी पाहिलेल्या वस्तूंना अआपाल्या सोबत उपलब्ध असणार्या साधनांवर उतरवत असतो.

मनुष्याने निसर्गातील वेगवेगळे आवाज एकले त्या आवाजाची नक्कल करण्याचा प्रयत्न सुरु झाला ह्या मध्ये विविध पशु पक्षांचे आवाज होते निसर्गामध्ये होत असणार्या बदलांचे आवाज होते वाहत्या पाण्याचा आवाज होता, वाहत्या वार्याचा आवाज होता , निसर्गात असणार्या विविध साथ संगती तुन निर्माण होणारा ध्वनी ह्यांची सुद्धा नक्कल सुरु झाली त्यातून मानवाच्या अभ्यासासाठी नवीन विषय संगीताच्या रूपाने मिळाला कला आणि संगीताच्या रूपाने मानवाचा शिक्षणाचा प्रवास सुरु झाला रेखा चित्राने चित्राचे स्वरूप धारण केले चित्र कलेचे रूप नंतर च्या काळात मूर्ती कलेने घेतले .गुहे मध्ये सुरुवातीला रेखा चित्र नंतर चित्र त्या नंतर विविध प्रकाच्या मूर्त्ती तयार होवू लागल्या पण ह्यानिर्मिती मध्ये बराच काल लागला प्रारंभिक चीत्र कलेपासून उन्नत मुर्तीकलेपर्यंत चा विकास काही सहस्त्रकान्चा होता . शिक्षण हे काहीतरी मिळवण्या पेक्षा काहीतरी देण्याकडे कल अधिक होता .त्यासाठी मोठा संघर्ष असावा .ह्यामध्ये संघर्ष स्वतः शीच होता जे आहे त्यात अजून सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून होता . ऐकलेल्या आवाजांना , ध्वनींना मूर्त रूप देण्याचा होता पाहिलेल्या दृश्यांना प्रत्यक्षात उतरवण्याचा संकल्प होता .शिक्षणाचा प्रवास आता चित्रकले पासून संगीता पर्यंत विस्तारित होता .रेशांपासून सुरु झालेला प्रवासाची दिशा सरळ नव्हती रेषा पासून आकृत्यांपर्यंत आता प्रवास होवू घातला आकृत्याना आता आकार प्राप्त होवू लागले होते तसतसा शिक्षणाचा प्रवास देखील एक एक पाउल पुढे टाकीत होता विज्ञानापेक्षा कलेच्या प्रसाराने शिक्षणाची कवाडे उघडली गेली.

चित्रकले नंतर संगीत आणि त्यानंतर बहुदा वनस्पतीशास्त्र माणसाच्या जीवनामध्ये शिकण्याचा विषय झाला असावा. अर्थातच आजच्या विस्तृत जीवशास्त्राच्या वा वनस्पतिशास्त्राच्या व्याख्येत हे पूर्ण पणे बसणार नाही परंतु सभोवताली सहज पणे मिळणार्या वनस्पती त्यांचा उपयोग त्यातील खाद्य कोणत्या अखाद्य कोणत्या ह्यातून माणसाच्या अभ्यासाची दिशा ठरली असावी तुलनेने प्रानिशास्त्र हे नंतर अभ्यासले गेले असावे जितके वनस्पती शास्त्र अभ्यासंयास सोपे तितके प्राणीशास्त्र नव्हते . त्यानंतर शरीर शास्त्र हे अभ्यासल्या गेले व विविध ज्ञान शाखांचा परिचय आता होवू लागला होता .आपण आवती भोवती असलेल्या सर्व वस्तूंचे निरीक्षण हा मानवाचा मूळ गुणधर्म त्यानुसार विविध ज्ञान शाखांची सुरुवात झाली .ज्ञानेंद्रियांचा देखील कर्मेंद्रिये यांचा बरोबरीने वापर हळू हळू वाढू लागला .सुरुवात केवळ कार्मेंद्रीयानेच होती नंतर ज्ञान इंद्रियांची आता गरज वाढू लागली वाढत जाणार्या ज्ञान शाखेचा उपयोग अनुभवत जाणार्या ज्ञान इंद्रिय व कर्म इंद्रिय ह्यांचा उपयोग वाढू लागला . चित्र कला हे ज्ञानाचे मूळ मानता येईल .भागवत गीते मध्ये सांगितल्या प्रमाणे “तद्विधी प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया उपदिक्षंती ते ज्ञान स्तत्व दर्शितम “ ज्ञान घेण्याच्या काही पद्धती आहेत सेवा भाव ,उत्कंठा आणि आदर असल्या शिवाय ज्ञान मिळत नाही . माते कडून घेतले गेलेले ज्ञान हे अवलोकानातून घेतले गेलेले होते .माते कडून घेतले गेलेल्या ज्ञाना व्यतिरिक्त ज्ञान हे तीन पद्धतीने घेतले जावू शकते .एक स्वतः चे ज्ञान स्वअध्यायन ह्या द्वारे घेतले गेलेले ज्ञान .ह्या मध्ये स्वतः ची इच्छा जास्त पाहिजे ह्या मध्ये एकलव्य हे आदर्श उदाहरण म्हणता येईल .गौतम बुद्धाला ज्ञान प्राप्ती झाली हि ह्याच प्रकारची होती . वर्धमान महावीरांनी ह्याच मार्गाने ज्ञान प्राप्ती करून घेतली .दुसरे म्हणजे आपल्या पेक्षा अनुभवी व्यक्ती वा गुरु कडून घेतले गेलेले ज्ञान .भगवान राम भगवान श्रीकृष्ण ह्या ष अनेक उदाहरणे ह्या साठी देता येतील . जिथे अडचण असेल तिथे मार्गदर्शन मिळते व आपले शिक्षण योग्य वाटेने चालू शकते .गुरु जवळ असणारे ज्ञान ह्यामध्ये विद्यार्थी अजून वाढ करीत असत .तिसरे ज्ञान घेण्याचे साधन वा मार्ग म्हणजे सामुहिक रीतीने घेतले गेलेले ज्ञान .वेद काला मध्ये अनेक ऋषी एकत्र येवून असलेल्या प्रश्नांची उकल केलेली आहे .ऋग्वेद काळामध्ये ऋग्वदाची रचनां करताना ११ मंडळांची रचना केलेली आहे प्रत्येक मंडलाचे एक प्रमुक ऋषी असत त्यांच्या मार्ग दर्शन ने ज्ञानार्जनाचे काम चालत असत .प्राचीन बौद्ध काला मध्ये अनेक विद्वान मंडळी आपले प्रश्न एकत्र येवून बसून त्यावर मार्ग काढीत असत . अशी किती तरी उदाहरणे ह्या साठी उपलब्ध आहेत.

शिक्षण हे केवळ दिले व घेतले जात नव्हते तर ते मिळवावे लागत त्या साठी संघर्ष होता ज्ञान घेणे हे तितके सोपे नव्हते म्हणून ज्ञानाला किमत होती त्या मुळे ज्ञानी व्यक्तीला देखील समाजा मध्ये किमत होती .शिक्षण हे स्वतः इतकेच परिवाराला आवश्यक आहे हे समजत असले तरी आपल्या जवळील श्रेष्ठता हि दुसऱ्या जवळ सहजासहजी जावू नये ह्या साठी प्रयत्न होता जो कि मानवाचा एक स्थायी भाव म्हणता येईल .ज्ञान म्हणजे सत्य , सत्य म्हणजे ईश्वर हि संकल्पना पुढे येवू लागली .ज्ञान साधना म्हणजे ईश्वर साधना आणि ह्या साठी प्रयत्न होवू लागले . सत्य म्हणजे ईश्वर म्हणजेच निसर्गातील शक्ती ,ह्या शक्तींना आवाहन केले जावू लागले त्या साठी मंत्र तयार केले जावू लागले ह्यातून निसर्ग पुजेची सुरुवात झाली .जगातील सर्वच धर्माचे तत्वज्ञान हे मुख्यतः दोन प्रकारापैकी आधारलेले आहे एक तर निसर्ग पूजा , नीसर्गामध्ये असणार्या विविध शक्ती ह्या बद्धल मानवास सुरुवातीपासूनच आकर्षण आहे उन वारा पाउस ह्यासोबत धरती कडे असणारा निर्माण आणि नव सृजन करण्या चा गुणधर्म धरणीकंप वा सागरीय लाटा विक्राळ महासागराने कधी मध्ये धारण केलेले रूप ,पृथ्वीच्या पोटाला चिरणारा व आतून प्रचंड गर्जना करीत बाहेर येवू पाहणारा लावा , तर कधी प्रचंड जंगलाला देखील आपल्या कवेत घेवू पाहणारा अग्नी ,आपल्या प्रचंड ताकातीनिशी असणाऱ्या अजानुबाहू वृक्षांना धाराशायी करू पाहणार्या वावटळी सदृष तुफान .निसर्ग लहरींचा कायम चालणारा खेळ व ह्यात पराधीनतेच्या साक्षातकाराने ह्या

सर्वच असणार्या निसर्गातील प्रमुख शक्ती ह्यांच्या आकर्षणापोटी किंवा भीती पोटी आणि त्याच बरोबर उत्सुकातेपाई ह्या निसर्ग शक्तींची उपासना चालवली गेली त्यातून शिक्षणाचे नवे मार्ग शोधले गेले नव्या वाटा चोखाळल्या गेल्या .त्यातून नवीन ज्ञानाची क्षेत्रे आढळून आली.

निसर्ग पूजे शिवाय माणसाला जर जास्त उत्सुकता होती ती आपल्या पूर्वजांची .पूर्वजांच्या आठवणीतून किवा त्यांच्या आदरातून त्यांची पूजा केली गेली हि पूजा आजच्या अर्थाने कदाचित नसेल तरी त्यांच्या ह्यासाठी भावना उत्कट असल्या पाहिजेत . जगातील सर्व प्राचीन धर्माची तत्वज्ञान ह्या संबधीतच दिसून येते .त्यातून शिक्षणाच्या नव्या वाटा शोधल्या गेल्या. हे सर्व नवीन पिढीला दिले गेले पाहिजे ह्या भावनेतून शिक्षणाच्या पद्धती शोधल्या गेल्या त्यानुसार तत्कालीन आवश्याकेनुसार ज्ञान व ज्ञानाच्या शाखा तयार झाल्या.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे पण हि जाणीव त्याला बर्याच कालानंतर झाली . पाषाण काला मध्ये प्राणीवत राहणारा हा नंतर समूहामध्ये शिकार करू लागला ह्या साठी समूहाची अवश्यकता समजून आली नंतर च्या काळात वसाहती निर्माण झाल्या छोट्या गावांचे रूप पालटू लागले मोठ्या शहरांचा उद्भव होवू लागला. त्यातून शहराच्या प्रशासनाचा प्रश्न ऐरणीवर आले त्यातून नगर प्रशासन, राज्य राज्य निर्मिती, सत्ता त्यासाठी सत्ता संघर्ष हे सर्व होवू लागले त्या साठी आवश्यक मनुष्य बाल तयार करणे जिकरीचे झाले त्यातून आवश्यक असे प्रशिक्षण आता राज्या च्या माध्यमातून जनतेला दिले जावू लागले .त्यातूनच हे सर्व नवीन विषय तयार होवू लागले त्यावर मंथने सुरु झाली .शिक्षणाच्या नव्या वाटा व नवे प्रवाह नजरेस भरू लागले .राज्य शास्त्र , अर्थ शास्त्र ,कर संकलन, कर प्रणाली हि सुरु झाली राज्याची आवश्यकता वाढू लागली तशी नवे नवे मार्ग उत्पन्न वाढवण्यासाठी शोधले जावू लागले ह्यातूनच व्यापाराची सुरुवात झाली .राज्याच्या सुरक्षेचे प्रश्न उभे राहिले त्यातून युद्ध शास्त्र निर्माण झाले. मनुष्याच्या आत्मिक प्रगति साठी देखिल नवीं न विषयाची सुरुवात झाली तत्व ज्ञान ,साहित्य ह्या साठी तयार झालेले विषय.

प्रत्येक मनुष्याला जन्म व मृत्यूचे कुतूहल आणि भीती आहे .जन्मा पूर्वीचे तथा मृत्यू नंतर चे रहस्य शोधण्या साठी विचार मंथना झालेली आहे . मृत्यू नंतर चे जग नंतर चा प्रवास ह्या बद्धल बर्याच धर्मात विवेचण व विश्लेषण केले गेले आहे .ते शोधण्याचा प्रयत्न केला गेला त्यासाठी विशिष्ठ प्रकारचा अंतिम प्रवास कसा असावा ह्या बद्धल पद्धती तयार केली गेली . कुठे जन्नत व जाहानुम ची संकल्प माडली गेली तर कुठे स्वर्ग व नरकाची संकल्पना माडली गेली .कुठे हेल व हेवन ची संकल्पनेचा स्वीकार केला गेला . स्वर्ग व नरक ह्याच्या चर्चेने धर्म शास्त्रात मृत्यू नंतर चे विधान हे विषय प्रामुख्याने अभ्यासले गेले .अवश्याकेनुसार आपआपल्या सोई नुसार समजे तथा गरजे नुसार त्याची व्याख्यां केली गेली .मृत्यू ची भीती आपणाकडून बरेच कार्य करून घेत असते .प्रत्येकाचा मृत्यू ठरलेला आहे पण ह्यातून काही कुठे सोडवणूक होते का त्या साठी बरेच प्रयत्न केले गेले काही वेळा प्रत्यक्षात तर काही वेळा काल्पनिक प्रयोगाने आयुष्याची दोरी मजबूत करण्या साठी प्रयत्न केले गेले .शिक्षणाचे उपयोग आणि प्रयोग आता सुरु झाले होते .ह्या जीवन शिक्षणातून दोन प्रवाह तयार झाले एक धार्मिकते कडे व धार्मिक शिक्षणातून अध्यात्मिकते व त्यातून पारलौकिक ते कडे प्रवास सुरु झाला तर दुसरा ऐहिक शिक्षणाकडून व्यावहारिकतेकडे प्रवाह होता. केवळ भारातीयांच्या बाबतीत असे नव्हे तर विश्वाच्या समस्त मानव जातीचा व समस्त संस्कृतीचा थोडा अधिक प्रवास असाच असावा. अध्यात्मिक शिक्षणाबरोबर लौकिक तथा पारलौकिक शिक्षणाची दिशा शोधल्या जावू लागली. गरज हि शोधाची जननी असते त्या नुसार उत्पन्न झालेल्या उत्कटतेतून शिक्षणाचा प्रवास सुरु झाला. कधी हा प्रवास संथ होता तर कधी अनपेक्षित रित्या जलद झाला.

जगाच्या इतिहासामध्ये सर्व प्रथम छोट्या गावांची स्थापना झाली त्यानंतर मोठ्या शहरांचा उद्भव झाला असावा असे मानले जाते त्यामुळे शिक्षणाची सुरुवात प्रत्येक घरापासून होवून त्याचा विस्तार गावापासून शहरापर्यंत गेलेला असावा . ज्ञात जगाच्या इतिहासामध्ये हडप्पा संस्कृती हि पहिली नागरी संस्कृती उदयास आली ह्या मध्ये मोहेंजोदरो , हद्दपा , लोथल , धोलाविरा ,कालीबंगा इत्यादी शहरे उदयास आली सिंधू घाटी संस्कृती मुळे जगाला शहरी संस्कृती चा जरी परिचय झालेला असला तरी हे आपणाला मानावेच लागेल कि ह्या नागरसंकृती पूर्वी ग्रामीण संकृती चे प्रभुत्व असलेच पाहिजे .शिक्षण हे वाढत्या शहरीकरणाबरोबर वाढत गेले, क्षेत्र वाढत गेली व असलेली क्षेत्रे विस्तारली गेली शिक्षण हे दिव्याच्या उजेडा सम अंधकारातून प्रकाशाकडे नेणारे साधन समजले जावू लागले प्राप्त परिस्थिती नुसार उपलब्ध ज्ञान शाखेची द्वारे उघडण्याचा प्रयत्न केला जावू लागला त्यातून शिक्षणाची मक्तेदारी देखील सुरु झाली . असलेले ज्ञान स्वतः कडे ठेवण्याचा कल वाढू लागला .कारण ज्यांच्या जवळ विशिष्ट ज्ञान आहे त्याना समाजात किंमत , मान सन्मान मिळू लागला त्यामुळे एक प्रकारे श्रेष्ठत्वाची जाणीव होवू लागली . पण असणार्या सामाजिक बंधनामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकरण होणे क्रमप्राप्त होते, कुठे कमी वा अधिक कालावधी असलं तरी आता प्रशासना कडून देखील शिक्षणाची जबाबदारी घेतली जावू लागली.

वैदिक काला पूर्वी रामायण व महाभारत ह्या धर्म ग्रंथात तत्कालीन शिक्षणाचे प्रतिबिंब रेखांकित करण्यात आले आहे . ह्या मध्ये श्रीरामाचे शिक्षण व तत्कालीन शिक्षण .गुरुकुल पद्धती ह्या काळात अस्तित्वात होती शिक्षणासाठी असणारा त्याग, मेहनत, चिकाटी हे दर्शविते. पण त्याच बरोबर राजा पासून शेवटच्या व्यक्तीपर्यंत शिक्षणासाठी असणारी तळमळ, कठोर मेहनत, त्याग ह्या शिवाय शिक्षण मिळू शकत नाही हे रेखांकित करते .ह्यातून तत्कालीन पद्धती व उपयुक्तता ह्या बद्धल माहिती मिळते, महाभारतामध्ये गुरुचे शिक्षक कसे झाले हि माहिती मिळते ,पण मुख्य माहिती वैदिक काळातून प्राप्त होते.

निसर्गाची पूजा त्यातील असणार्या शक्तींची उपासना करण्यासाठी प्रारंभी ऋग्वेद केला गेला ज्या मध्ये निसर्गाच्या शक्तींना कसे प्राप्त करावयाचे ह्याचे मार्ग सुचवले आहेत ह्या असणार्या शक्तींना प्राप्त करण्या चे मार्ग त्या साठी आवश्यक असणारे विधी व त्यानुसार लागणारे मंत्र तयार केले गेले शिक्षणाच्या दिशेने हे पहिले क्रांतिकारी पाउल म्हटले तर हरकत नाही ते ह्या मुळे की तो

पर्यंत इतक्या मोठ्या प्रमाणात शिक्षण दिले घेतले जात नसे .तयार झालेले मंत्र कसे म्हणावे ह्यासाठी सामवेद तयार करण्यात आले .लागणार्या वस्तू तथा पूजा विधी ह्यासाठी यजुर्वेद तयार करण्यात आले. ह्या शिवाय अन्य कारणासाठी अथर्व वेद तयार केले गेले कोणतीही लिखाणाची सुविधा साधन नसताना हजारोच्या संखेने ऋचा तयार केल्या गेल्या. म्हणण्याची पद्धत त्यातील व्याकरण व अन्य बारकावे सखोल पणे तपासल्या गेले विद्यार्थान कडून हे पाठांतरीत करवले जावू लागले शिक्षणामध्ये पाठांतराचे महत्व अधोरेखित करण्यात आले. भाषा व व्याकरण ह्या कडे जास्तीचे लक्ष दिले जावू लागले. जरी भाषा ह्या आधीच शिकणे सुरु झाले असले तरी व्याकरणिक भाषेची सुरुवात झाली.

धर्म शिक्षणाची सुरुवात त्याबारोबर भाषा शास्त्राचा झालेला विकास शिक्षनाची व समाजाची दिशा ठरवत गेले.वैदिक वाग्मय तयार होवू लागले वेदा सोबत ईश्वराचा विचार, ईश्वराचे अस्तित्व,ईश्वराची प्राप्ती ,"स्वः" चा विचार, जन्माचे रहस्य, मृत्यू ची मीमांसा, जगाची उत्पत्ती, त्याची कारणे, त्याचे अस्तित्व, जीवनाचे लक्ष ह्या सर्व विषयांकडे गांभीर्याने पाहिले जावू लागले त्यातून उपनिषदांची निर्मिती सुरु झाली. वेद वा उपनिषदे ह्यांची निर्मिती कुणा एका व्यक्ती कडून झालेली नाही तर अनेक महान तपस्वी शिक्षण देणारे थोर ऋषी ह्यांनी केलेली आहे .हि रचना एका ठराविक काळात न होता काही कालावधी मध्ये झालेली आहे .ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्व वेद त्याच बरोबरीने १८ उपनिषदे ज्ञान रूपाने संग्रहित झाले . नंतर च्या काळात पुराणे तयार झाली सामान्य जनांना ज्ञान प्रत्यक्ष रूपाने दिले तर समाजाने कठीण जाते त्या साठी जर गोष्टी रूपाने ज्ञान दिले गेले तर समजण्यास सोपे जाते त्या नुसार पुराणे तयार केली गेली विविध ऋषींनी आपआपले विचार शब्द बद्ध करून ठेवले त्यात समाज चालण्या साठी आवश्यक नियम ह्यांचा समावेश होता त्या स्मृती रूपाने पुढे आल्या. नंतर च्या कालाय समाजासाठी सूत्र बद्धता आणण्या साठी ह्याचा उपयोग झाला.

**MATERIAL:** ज्ञान मिळवण्यासाठी आवश्यक असणारी सर्व साधने संगणक, महाजाल (internet ), पुस्तके चित्रकलेची साधने.

**METHOD:** निरीक्षण अवलोकन आणि निष्कर्ष हि ह्यासाठी पद्धती असू शकेल.

**DISCUSSION:**

धर्म शिक्षणाची सुरुवात त्याबारोबर भाषा शास्त्राचा झालेला विकास शिक्षनाची व समाजाची दिशा ठरवत गेले.वैदिक वाग्मय तयार होवू लागले वेदा सोबत ईश्वराचा विचार, ईश्वराचे अस्तित्व,ईश्वराची प्राप्ती ,"स्वः" चा विचार, जन्माचे रहस्य, मृत्यू ची मीमांसा, जगाची उत्पत्ती ,त्याची कारणे ,त्याचे अस्तित्व ,जीवनाचे लक्ष ह्या सर्व विषयांकडे गांभीर्याने पाहिले जावू लागले त्यातून उपनिषदांची निर्मिती सुरु झाली . वेद वा उपनिषदे ह्यांची निर्मिती कुणा एका व्यक्ती कडून झालेली नाही तर अनेक महान तपस्वी शिक्षण देणारे थोर ऋषी ह्यांनी केलेली आहे .हि रचना एका ठराविक काळात न होता काही कालावधी मध्ये झालेली आहे .ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्व वेद त्याच बरोबरीने १८ उपनिषदे ज्ञान रूपाने संग्रहित झाले . नंतर च्या काळात पुराणे तयार झाली सामान्य जनांना ज्ञान प्रत्यक्ष रूपाने दिले तर समाजाने कठीण जाते त्या साठी जर गोष्टी रूपाने ज्ञान दिले गेले तर समजण्यास सोपे जाते त्या नुसार पुराणे तयार केली गेली विविध ऋषींनी आपआपले विचार शब्द बद्ध करून ठेवले त्यात समाज चालण्या साठी आवश्यक नियम ह्यांचा समावेश होता त्या स्मृती रूपाने पुढे आल्या. नंतर च्या कालाय समाजासाठी सूत्र बद्धता आणण्या साठी ह्याचा उपयोग झाला.

**ANALYSIS:** समाजासाठी लागणार्या नियमा सोबतच आवश्यक असे उपजीविकेची साधने शोधली जावू लागली त्यातून विविध प्रकारचे कारागीर तयार झाले त्यांची एकानंतर एक पिढी निर्माण होवून त्या कलेला महत्व मिळाले. ह्यातूनच निर्माण कार्य झाले असंख्य अद्वितीय बांधकामे तयार केली गेली. राजाश्रय मिळाल्याने मोठ्या इमारती, मंदिरे, स्थापत्य निर्माण झाले. विना शिक्षणाने अशी असाध्य कामे संभव करणे अशक्य आहे.

**FINDINGS:** शिक्षण हे सदैव चालणारी प्रक्रिया आहे .प्रत्येक जन शिक्षणाचा विकास स्वतः बरोबरच सुरु होत असतो प्रत्येक जन शिक्षणाचा अभिलाषी असतो ज्ञानाच्या विविध शाखान पैकी चित्र कले पासून सुरुवात जरी झालेली असली तरी अनेक विद्या शाखांचा विकास कालाप्रमाणे व आवश्यकते प्रमाणे झाला आहे.

**SUMMARY:** शिक्षण हे आत्म निर्भर बनवण्या साठी असते. प्राचीन कालापासून सुरु झालेला शिक्षणाचा प्रवास अनंत असणार आहे चित्र कले पासून सुरु झालेली सुरुवात अनंत विद्या शाखांना स्पर्शून जाते व व्यक्तीक आप्पुन्ति साधते

**REFERENCES:**

1. Romila Thapar ; History of early India From the origins to 1300, The Penguin. Penguin books, 2002, Pp 556.
2. TYAGI HARIPAL; BHARTIY KALA UDBHAV AUR VIKAS: भारतीय कला उद्भव और विकास (वास्तु, मूर्तिशिल्प, चित्र) PUBLICATION DIVISIO INF & BROADCATING GOV OF INDIA, DELHI, 2019, Pp.169.